पुणे, मंगळवार, १३ ऑक्टोबर २०१५

सकाळ पुणे

# गावातील जमिनींची पुनर्मोजणी होणार

**पुणे, ता. १२ :** मुळशी तालुक्यातील पिरंगुट परिसरातील बारा गावांचा प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर आता संपूर्ण पुणे जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील गावांच्या जमिनीची पुनर्मोजणी भूमिअभिलेख विभागातर्फे हाती घेण्यात येणार आहे. शंभर वर्षांनंतर प्रथमच अशा प्रकारे जमिनीची मोजणी होणार आहे. जमिनींचे वाद मिटण्याबरोबरच न्यायालयीन दावे कमी होण्यास मदत होणार आहे.

संपूर्ण राज्यातील ग्रामीण जमिनींच्या पुनर्मोजणीचा प्रकल्प राबविण्यास शासनाने नुकतीच मान्यता दिली. पहिल्या टप्प्यामध्ये प्रत्येक महसुली विभागात एका जिल्ह्यामध्ये पुनर्मोजणीचे काम होणार आहे. त्यासाठी २९३.६१ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामध्ये पुण्याचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील जमिनींची मोजणी स्वातंत्र्यपूर्व काळात झाली होती. कालानुरूप वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण व औद्योगीकरण यामुळे मूळ धारण जमिनींचे मोठ्या प्रमाणात हस्तांतरण होत आहे. त्याचप्रमाणे वारसामुळे व विक्रीमुळे जमिनींची विभागणी होऊन जमिनींचे अनेक तुकडे झाले आहेत. यामुळे प्रत्यक्ष वहिवाट, भूमिअभिलेख नकाशे आणि अधिकार अभिलेख यात अनेक ठिकाणी मेळ राहिलेला नाही. याचा परिणाम म्हणून अनेक ठिकाणी जमीनविषयक वाद निर्माण होत आहेत.

पुनर्मोजणीमध्ये सॅटेलाइट इमेजवर मूळ भूमापन नकाशे बसवून भूभाग नकाशे तयार करण्यात येणार आहेत. त्यासाठी भूमिअभिलेख विभागाकडील सर्व भूमापन नकाशांचे डिजिटायझेशन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी 'ई-नकाशा' हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत टिपण, काटेफाळणी, फाळणी नकाशा, फेअर स्केच, कोर्ट वाटप नकाशा, सविस्तर भूमापन मोजणी नकाशा, गटबुक नकाशा, बिनशेती नकाशे आदी १३ प्रकारचे नकाशांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे. या १३ प्रकारच्या नकाशांचे सुमारे ९२ लाख ७५ हजार २२२ इतके दस्त आहेत.

## भोगवटादारांकडून खर्च वसुली

**या पुनर्मोजणी कार्यक्रमावर होणारा खर्च, संबंधित तालुक्याचे पुनर्मोजणीचे काम पूर्ण झाल्यानंतर, संबंधित भोगवटादारांकडून सनद फीच्या स्वरूपात ७५० रुपये प्रतिहेक्टर (३०० रुपये प्रतिएकर) या दराने वसूल करण्यात येणार आहे. पुनर्मोजणी कामाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासन व ग्रामस्थ यांच्यात समन्वय साधणे, पुनर्मोजणीच्या कामात व हरकतीनिवारणाच्या कामात नागरिक व मोजणी यंत्रणेचे प्रतिनिधी यांना मदत करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतनिहाय अस्तित्वात असलेल्या महात्मा गांधी तंटामुक्ती ग्रामसमितीस पुनर्मोजणी कामासाठी 'पुनर्मोजणी ग्राम समिती' म्हणून घोषित करण्यात येणार आहे.**